चैतन्यसंस्था
ग्रामीण महिला स्वयंसिद्ध संघ

Page No.: 00262
Date:

56

प्रति,
मा. आमदार श्री निलेशजी ज्ञानदेव लंकेसाहेब
विनंती विशेष अर्ज,
विषय :- अपेक्षा महिला स्वयंसहाय्यता महिला विभाग वाघुंडे बु।। या महिला विभागास वाघुंडे बु।। येथे स्वतंत्र्य कार्यालय इमारत मिळणेबाबत.

महोदय,
वरील संदर्भात विषयानुसार आम्ही खालील 17 महिला बचत गट, प्रतिनिधी व सदस्य आपणास विनंतीपूर्वक कळवू इच्छितो की मौजे वाघुंडे बु।। येथे सध्या 17 महिला स्वयंसहाय्यता महिला बचत गट असून त्या सर्वांचा मिळून अपेक्षा महिला स्वयसहाय्यता महिला विभाग गेल्या 15 वर्षापासून नेमाने काम करीत आहे.
सध्या स्थितीत या गावात या अपेक्षा महिला स्वयंसहाय्यता महिला विभागा अंतर्गत 17 महिला बचत गट खालीलप्रमाणे नावाने कार्यरत आहे. व त्यांची सभासद संख्या 260 इतकी असून दर महिन्याला रुपये 8 ते 9 लाखापर्यंत व्यवहार होतो व दरमहिन्याला 5 तारखेला नियमित सर्व महिला बचत प्रतिनिधी व सभासदांची बैठक होते, परंतु सदर बैठक घेण्यास खालीलप्रमाणे अडचणी येतात
1) सदर अपेक्षा महिला स्वयसहाय्यता महिला विभागास स्वतंत्र्य कार्यालय नाही, त्यामुळे खालील समस्या उद्‌भवतात.
2) सध्यास्थितीत या विभागाला कार्यालयाला स्वतंत्र्य

जागा नसल्याने मिटिंग एखाद्या झाडाखाली किंवा उघड्या जागेवर घ्यावी लागते.

3) मिटिंग उघड्यावर होत असल्याने महिलांनी आणलेल्या नोट वाऱ्याने उडतात तसेच कागदपत्रे फाटतात.

4) जास्तीचा व्यवहार असल्यामुळे पैसे ठेवण्यास असुरक्षित वाटते.

5) मिटिंगमध्ये दिलेल्या सूचना व कामे सांगण्यास अडचणी येतात. महिलांना सांगितलेल्या सूचना ऐकू येत नाही.

6) कार्यालय नसल्याने दप्तर ठेवता येत नाही.

7) बचत गटास भेट देणाऱ्या प्रतिनिधी / अधिकारी यांना मार्गदर्शक म्हणून बोलावता येत नाही.

तरी वरील समस्यांचा विचार करून महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने मध्यवर्ती ठिकाणी कार्यालयीन स्वतंत्र इमारत मिळावी, हि विनंती.

आपले विश्वासू

अपेक्षा विभाग

अध्यक्ष सचिव

गाडीलकर पी.डी.

अध्यक्ष सचिव
नारीशक्ती महिला स्वयंसहाय्यता बचत गट
वाघुंडे बु.।।, ता. पारनेर, जि. अ.नगर

| बचत गटाचे नाव | अध्यक्ष |
|---|---|
| 1) राधिका | योगिता भुजबळ |
| 2) जयहिंद | चंद्रकला रासकर |
| 3) प्रगती | स्वाती रासकर |
| 4) वाघेश्वर | कविता शेलार |
| 5) आशिर्वाद | पुष्पा गाडीलकर |
| 6) भाग्यलक्ष्मी | पुष्पा गाडीलकर |
| 7) सुवर्णयोग | पुष्पा गाडीलकर |
| 8) मारिया | सुमन वाघमारे |
| 9) वैष्णवी | नंदा दिवटे |
| 10) माहेर | नंदा दिवटे |
| 11) जयदुर्गा माता | रंभाबाई वाघमारे |
| 12) संघर्ष | रंभाबाई वाघमारे |
| 13) नारी शक्ती | रंभाबाई वाघमारे |
| 14) संतसावता | मीना गाडीलकर |
| 15) कल्पतरु | सोनाली रासकर |
| 16) समृद्धी | कल्पना गाडीलकर |
| 17) मैत्री | गौरी गाडीलकर |

M T W T F S S

Page No.:

Date:

YOUVA

अर्जदार :- अपेक्षा महिला स्वयंसहायता महिला
विभाग वाघुंडे बु।।, ता- पारनेर
यांजकडून सविनय सादर -